# वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

(कार्यक्षेत्र : मुंबई / नवी मुंबई / रायगड / पालघर)

(नोंदणी क्रमांक बीओएम / आरएसआर /२२८ सन १९६४)

डी -१, तळमजला, वस्तू व सेवा कर भवन, बलवंतसिंग धोदी मार्ग, माझगांव - ४०० ०१०.

दूरध्वनी : २३७६ ००१४ / २३७४ ४३०७

जावक क्र. : १०१/२०२१ /२०२२.     दिनांक : 15 JUL 2021

प्रति,
मा. सर्व आस्थापना अधिकारी,
राज्य वस्तू व सेवा कर विभाग.

विषय :— वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई या संस्थेच्या कर्ज वसुली बाबत .....

महोदय/महोदया,

वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई ही संस्था, राज्य वस्तू व सेवा कर विभागातील अधिकारी—कर्मचारी यांची, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नुसार सहकार कायद्यान्वये नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेच्या उपविधीनुसार विभाग प्रमुख या नात्याने मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे या संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

विभागातील अधिकारी—कर्मचारी संस्थेचे सभासदत्व स्विकारतेवेळी, त्यांचे नांवे असलेल्या संस्थेच्या दायित्वाची रक्कम, त्यांचे मासिक वेतन तसेच विभागातून त्यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय रकमेतून कपात करण्याचे अधिकार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अन्वये, मा. राज्यकर आयुक्तांना देतात. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९(२) अन्वये, अधिकारी—कर्मचारी यांचे नांवे असलेले कर्ज दायित्व कपातीची जबाबदारी, वेतन आहरण व संवितरण अधिकारी (आस्थापना अधिकारी) यांचेवर सोपविण्यात आली आहे.

आपल्या आस्थापनेवर असलेले अधिकारी—कर्मचारी यांचे मासिक वेतन तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय रकमेतून संस्थेच्या मागणीपत्रकानुसार कपात करण्यात येते. आपणांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल संस्थेचे संचालक मंडळ नेहमीच आभार व्यक्त करते.

आता असे निदर्शनास आले आहे की, काही आस्थापना अधिकारी त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी—कर्मचारी यांचे वेतनातून तसेच विभागातून त्यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय रकमेतून, संस्थेच्या मागणीपत्रकानुसार संपूर्ण वसूली न करता सवलत देतात. तर काही प्रकरणी, वेतन देयक तयार करणारे कर्मचारी, काही अधिकारी—कर्मचारी यांचे वेतनातून संस्थेची कोणतीही वसूली न करता परस्पर सवलत देतात. अशा स्वरुपाची सवलत, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ४९ चा भंग करणारी आहे. आपली संस्था शासकीय अधिकारी—कर्मचारी यांची पगारदार संस्था असल्याने, थकबाकी प्रमाण शुन्य आवश्यक असल्याचे मत लेखापरिक्षक व्यक्त करतात. प्रसंगी संबंधित कर्जदारांच्या कर्जाची हमी स्विकारलेल्या अन्य सभासदांकडून नाईलाजास्तव जामीन वसुलीची कटु कारवाई करावी लागते. ती संस्था व जामीनदार या दोहोंनाही वेदनादायक आहे.

# वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

(कार्यक्षेत्र : मुंबई / नवी मुंबई / रायगड / पालघर)

(नोंदणी क्रमांक बीओएम / आरएसआर /२२८ सन १९६४)

डी -१, तळमजला, वस्तू व सेवा कर भवन, बलवंतसिंग धोदी मार्ग, माझगांव - ४०० ०१०.

दूरध्वनी : २३७६ ००१४ / २३७४ ४३०७


जावक क्र. : १०१/२०२१/२०२२ दिनांक : 15 JUL 2021



संस्थेच्या कर्ज मंजूरीचे प्रचलित पद्धतीनुसार, सभासदांना कर्ज मंजूरी करताना, आस्थापना अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या वेतन प्रमाणपत्राचे आधारे कर्ज मंजूर करण्यात येते. काही वेळा असे होते की, पतपेढीकडून कर्ज घेतल्यानंतर काही अधिकारी–कर्मचारी शासकीय अग्रीम घेतात, भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीत वाढ करतात. यामुळे संबधितांचे वेतनातून पतपेढी वसूली करण्यास तांत्रिक अडचण निर्माण होते किंवा पतपेढीची वसूली खूपच अल्प प्रमाणात करण्यात येते. यामुळे थकबाकीदारांचे प्रमाण वाढत आहे. वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७(३)(एक) अन्वये, वेतनातील सर्व कपातीची रक्कम, एकूण ढोबळ मासिक वेतनाच्या ७५% पर्यंत करता येते.

तसेच, सभासदांना त्यांचे आत्यंतिक आर्थिक अडचणीचे कारणास्तव, पतपेढीत लेखी अर्ज सादर केल्यास वेतनातील मुद्दल कर्ज रक्कम भरणा करण्याकरीता सवलत देण्यात येते. तरी आपल्या आस्थापनेवर नियुक्त असलेले या संस्थेचे सभासदांचे वेतनातून तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या शासकीय रकमेतून, संस्थेच्या मागणीपत्रकानुसार संपूर्ण दायित्व कपात करण्यात यावे, अशी संचालक मंडळाची आपणाकडून अपेक्षा आहे व त्यासाठी आपणांस या पत्राद्वारे नम्र विनंती करण्यात येत आहे.

मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे या संस्थेच्या कपाती संदर्भात निगर्मित करण्यात आलेल्या परिपत्रकांची प्रत अवलोकनार्थ सादर करीत आहे.

आपला विनित,

(प्रमोद रा. तावडे)
प्रमुख कार्यवाह

प्रत सविनय सादर :–

१. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.